# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश.

जा.क्र.सनिशे/वि-३/कलम ८८/शाहूपतसं./ /१७
कार्यालय-सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,शेगांव
दिनांक - ०४/०९/२०१७

वाचा: (१) श्री.दिपक जाधव, विशेष लेखापरीक्षक, वर्ग-२ सहकारी संस्था,(फि.प.) बुलढाणा यांचे कार्यालयीन पत्र क्र.विलेप(फि.प.)/तपा.अह/रा.शा.मा.सह.सं/११३/२०१७ दिनांक १८/०७/२०१७

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८.

(३) महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे आदेश क्र.सीएसएल-१४९३/ ११६२/सीआर-४७/१५-सी दिनांक-०७/०८/१९९३

ज्याअर्थि विशेष लेखापरीक्षक वर्ग-२ सहकारी संस्था (फि.प.) बुलढाणा यांनी राजर्षी शाहू महाराज मागासवर्गीय सहकारी संस्था,म.शेगांव र.नं.९६४ या संस्थेचे दि.३१/०३/२०१६ अखेर घेणे असलेल्या सर्व प्रकारातील कर्ज प्रकरणांची तपासणी पुर्ण केली असुन त्रृटींसह तपासणी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

आणि, सदर विशेष अहवालामध्ये कर्ज प्रकरणांचे लेखापरीक्षण करतेवेळी खालीलप्रमाणे गंभीर दोष निदर्शनास आले आहेत.संस्थेने कर्ज वाटप केलेल्या व सदर कर्ज थकीत असलेल्या कर्जप्रकारनिहाय कर्जाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्जप्रकार | सभासद संख्या | रक्कम | | | तारणी रक्कम | विनातारणी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | हप्तेबंदी कर्ज | ३३ | ८०४४९९ | ७०२१५६ | १५०६६५५ | ५३३२७० | ९७३३८५ |
| २ | वैयक्तीक कर्ज | ८३ | ३५०३७६९ | १९५९९२६ | ५४६३६९५ | ७७५०३ | ५३८६१९२ |
| ३ | वाहन तारण कर्ज | १७ | ७५११६४ | १६७३०२ | ९१८४६६ | -- | ९१८४६६ |
| ४ | कॅश क्रेडीट कर्ज | ०८१ | १५८२८६६ | ११९९९६ | १७०२८६२ | १३९६६६२ | ४०६२०० |
| ५ | मुदत ठेव कर्ज | ५२ | १४६५४७४७ | १४९५२०८ | १६१४९९५५ | -- | १६१४९९५५ |
| ६ | दैनिक ठेव तारण | ३४ | ३१८४२८ | ७७२९४६ | १०९१३७४ | -- | १०९१३७४ |
| | एकुण :- | २२७ | २१६१५४७३ | ५२१७५३४ | २६८३३००७ | १६६६९२१ | ३३८९४२५ |

तपासणी अहवालास नमुद केलेप्रमाणे ज्या कर्जदारांनी मा.न्यायालय व संस्थेच्या बँक खात्यामध्ये कर्जाच्या रकमेचा भरणा केलेला आहे त्या रकमा दि.३१/०३/२०१६ चे घेणे अखेर मधुन वगळण्यात यावे.

ज्याअर्थी, वाचा क्र.१ वरील नमुद तपासणी अहवालात कर्ज प्रकरणे तपासणीअंती खालीलप्रमाणे दोष निदर्शनास आले आहेत.

Scanned by CamScanner

-: **आदेश** :-

महाराष्ट्र शासन, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे आदेश क्र.सीएसएल-१४९३/११६२/सीआर-४७-१५ दि.०७/०८/१९९३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी एस.पी.पोहरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.शेगांव जि.बुलढाणा सदर आदेशातील प्रस्तावणेत दर्शविल्यानुसार विशेष अहवालातील गंभीर बाबी विचारात घेऊन राजर्षी शाहू महाराज मागावर्गीय नागरी सहकारी पत संस्था,म.शेगांव र.नं.९६४ ता.शेगांव जि.बुलढाणा या संस्थेच्या नुकसानीकरीता कोण किती रकमेकरीता जबाबदार आहे अशा व्यक्तीविरुध्द जबाबदारी निश्चित करणेकरीता पॅनेल सुचीमधील ॲड.श्रीमती एस.एस.चांदोरे, बुलढाणा यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना वरील कर्ज प्रकरणांचे लेखापरीक्षण अहवाल या आदेशासोबत जोडला असुन अहवालात नमुद सर्व बाबी विचारात घेऊन नमुद मुद्यांच्या अनुषंगाने ही वैधानिक चौकशीची कार्यवाही २ महिन्यात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम १९६१ अंतर्गत पुर्ण करावी. संबंधितांनी केलेले गैरप्रकार, अपकार्य, अधिकाराचा व निधीचा दुरुपयोग हया संबंधात जे जबाबदार आहेत अशा व्यक्तींविरुध्द दोषारोप पत्र द्यावे तसेच अपचारी व्यक्ती जबाबदार असेल त्यांना त्या रकमा भरण्यासाठी (होणाऱ्या व्याजासह) आदेश निर्गमित करावेत. या चौकशी कामी येणारा खर्च हा चौकशीमध्ये दोषी आढळुन आलेल्या व्यक्तींकडुन त्यांचे दोषाचे प्रमाणात विभागुन वसुल करण्याबाबत आदेशात नमुद करावे.

ठिकाण:- शेगांव
दिनांक:- ०४/०९/२०१७

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तालुका शेगांव

4/9/2017

(एस.पी.पोहरे)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,शेगांव

प्रति,

१) ॲड.श्रीमती एस.एस.चांदोरे, कोर्ट रोड, बुलढाणा तथा प्राधिकृत अधिकारी, यांना देवुन सुचीत करण्यात येते की, त्यांनी सविस्तर चौकशी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) अध्यक्ष / व्यवस्थापक, राजर्षी शाहू महाराज मागावर्गीय नागरी सहकारी पत संस्था,म.शेगांव र.नं.९६४ ता.शेगांव जि.बुलढाणा यांना उचित कार्यवाहीकरीता रवाना.

प्रतिलिपी :-

१) मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, बुलढाणा यांना माहितीकरीता सविनय सादर.

२) मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, बुलढाणा यांना माहितीकरिता सविनय सादर.

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,शेगांव

Scanned by CamScanner